क्र.शिक्रीपी/ टेवेहॉ/छगदुरुस्ती/२०१९-२०/का-११/ ५१५
शिवछत्रपती क्रीडापीठ,म्हाळूंगे, बालेवाडी,पुणे
दिनांक - 31 JUL 2019

प्रति,

-------------------------------------
-------------------------------------
-------------------------------------

विषय - **टेबल टेनिस** हॉल हॉल च्या छताची गळती दुरुस्ती करणे बाबत

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शिवछत्रपती क्रीडा संकुलातील **टेबल टेनिस** हॉल च्या छत गळतीच्या दुरुसतीचे काम करण्यास आपण सादर प्रत्यक्ष पहाणी करुन दिनांक ०२/०८/२०१९ पर्यंत आपले दरपत्रक कार्यालयीन वेळेत सादर करावे.

१. सर्व कामगारांच्या सुरक्षा साधनांसह सर्व कामगारांची सुरक्षितता ही संबधित ठेकेदाराची जबाबदारी असेल.
२. उंचावरील काम करणा-या सर्व कामगारांचे व्यक्ती संरक्षण विमा असणे अवश्यक.
३. उंचावरील छत दुरुस्तीच्या कामासाठी पन्हाळी, पत्रे इत्यादी हताळण्याची साधने असणे आवश्यक आहे. याबाबत कार्यालयाकडे सदरील माहिती काम सुरु करण्यापुर्वी देणे आवश्यक आहे.
४. कंत्राटदाराने कामाची सर्व पहाणी करुन कामाचे स्वरुप व कामाची जोखीम लक्षात घेणे अवश्यक आहे. सदरील दुरुसती करीता सर्व जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
५. सर्व जुळणी साधने, माचण, पाडा याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
६. जागेच्या रेखांकनापेक्षा छताची अधिक सखोल तपासणी करणे महत्वाचे आहे. तथापी उंची आणि परिमाणे दर्शवणारी रेखाचित्रे अवश्यकता भासल्यास क्रीडा विभागकडून दिली जातील.
७. सदरील कामाचे आदेश प्राप्त झाल्यापासून कंत्राटदाराने सदरील काम ८दिवसात पुर्ण करणे आवश्यक.
८. काम पुर्ण केल्यावर आपणाकडून सादर करण्यात येणा-या देयकातून एकुण रक्कमेवर सुरक्षा ठेव कपात करण्यात येईल.
९. क्रीडा विभागाच्या या मालमत्तेचे काळजीपुर्वक रक्षण करण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
१०. आपण सादर केलेल्या दरपत्रकातील दराशिवाय , नियमा नुसार एसजीएसटी व सीजीएसटी असे एकूण १८ टक्के करा व्यतिरिक्त इतर कोणतेही कर इ. देय राहणार नाहीत.
११. सदरील दुरुस्ती काम करत असताना इतर कोणतेही तुटफुट किंवा नुकसान झाल्यास त्याकरीता होणाऱ्या अतिरिक्त खर्चाची रक्कम आपल्या प्रतिष्ठानाच्या सुरक्षा ठेवीतून कपात करण्यात येईल.
१२. सदर कामाकरीता कोणताही अग्रीम किंवा अंशत: देयक अदा केले जाणार नाही.
१३. आपल्या प्रतिष्ठानाकडे सोपविण्यात आलेले काम प्रत्यक्ष प्रत्यक्षिक व तपासणी करुन समाधानकारक पद्धतीने पुर्ण झाल्यानंतर काम पुर्णत्वाचे व कामाचे देयक सादर करावे.
१४. सदर देयक आरटीजीएस द्वारे आपल्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. देयक अदा होण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.
१५. देयकातून प्रचलीत दरानुसार आयकर (TDS) वसूल करण्यात येईल.

(स्थळप्रत मा. सहसंचालक महोदय यांचे मान्यतेने )

उपसंचालक
क्रीडा व युवक सेवा,
शिवछत्रपती क्रीडापीठ,पुणे